CMYK
●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ४ थे ●अंक १४४ ● सोमवार, दि. ०२ सप्टेंबर २०२४ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रुपये
●Beed (Maharashtra) ●Year 4 ●Issue 144 ●Monday, 02 September 2024 ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 ●Page 1 ●Pages 4 ●Price 3 Rs.




# दैनिक मराठवाडा पत्र

महाराष्ट्राचा बुलंद आवाज

। बीड । परभणी । छत्रपती संभाजीनगर । जालना । लातूर । धाराशिव । हिंगोली । नांदेड । नगर

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




बीड ● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955




# स्मशानभूमीचे काम दिडवर्षापासुन रखडले पावसात अंत्यविधी करण्याची नामुष्की

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील जिल्हा परिषद सर्कलचे गाव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लिंबागणेश येथील स्मशानभूमीचे काम आ.संदिप क्षीरसागर यांच्या कार्यकर्त्यांच्या नाकर्तेपणामुळे रखडलेले असुन पावसात अंत्यसंस्कार करावे लागत असल्याने ग्रामस्थांमध्ये तिव्र नाराजी असुन सरण रचुन ठिय्याआंदोलन केल्यानंतर आ.संदिप क्षीरसागर यांनी दिड वर्षांपूर्वी स्मशानभूमीसाठी मंजुर केलेल्या ८ लक्ष रुपयांच्या निधीतून अद्याप काम पूर्ण का नाही?? त्यामुळे आमदार संदीप क्षीरसागर साहेब नरकयातना संपणार कधी?? आणि लिंबागणेश येथील स्मशानभूमीचे काम पूर्ण होणार कधी?? असा प्रश्न सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी विचारला आहे.



▶ बीड जिल्ह्यातील १३९४ पैकी ६५६ लहान मोठ्या गावात स्मशानभूमीची सोय नसल्याने पावसाळ्यात मृतदेहाची हेळसांड होत आहे. तर आस्तित्वात असलेल्या स्मशानभूमीची दुरावस्था असुन ढासळलेले बांधकाम, उडुन गेलेले पत्रे तर काही ठिकाणी काटेरी झुडुपातुन वाट काढत दहन शेडकडे जावे लागते. काही गावांमध्ये स्मशानभूमीसाठी जागा नसल्याने अंत्यसंस्कार रोखण्यात आल्याच्या घटना घडलेल्या आहेत. त्यातुन वादविवाद निर्माण होतात, सामाजिक स्वास्थ्य बिघडते मात्र याचे लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाला गांभीर्य दिसून येत नाही. वारंवार निवेदने तसेच आंदोलनानंतर सुद्धा प्रशासनाला जाग येत नाही हि दुर्दैवी बाब आहे. – डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश येथील २० वर्षांपूर्वी बांधण्यात आलेल्या स्मशानभूमीची दुरावस्था असुन पत्रे उडुन गेलेले, बांधकाम ढासळलेल्या अवस्थेत असल्याने नविन स्मशानभूमी बांधकामासाठी निधी देण्यात यावा यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी स्मशानभूमीत सरण रचुन ठिय्या आंदोलन केले होते. याची दखल आ.संदिप क्षीरसागर यांनी घेत जिल्हा वार्षिक (दहन/दहनभुमी) जन सुविधा विशेष अनुदान योजनेंतर्गत मुलभूत सुविधांसाठी सन २०२२-२३ आर्थिक वर्षाकरीता ग्रामपंचायत लिंबागणेश येथे स्मशानभूमी बांधकाम व सुशोभीकरणासाठी ८ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करत दि.३१ मार्च २०२३ रोजी प्रशासकीय मान्यता दिली होती. मात्र आमदार साहेबांच्या कार्यकर्त्यांच्या हलगर्जीपणामुळे स्मशानभूमीचे काम रखडलेले असुन काल सायंकाळी अल्पशा आजाराने मयत झालेल्या कै.केशरबाई तुळशीराम नाईकवाडे यांचा अंत्यविधी आज दि.१ सप्टेंबर रोजी सकाळी भर पावसात करावा लागला. यावेळी पावसामुळे तारांबळ उडाली असून ग्रामस्थांनी रखडलेल्या स्मशानभूमीच्या कामामुळे पावसात अंत्यसंस्कार करण्याची नामुष्की आल्याने तिव्र नाराजी व्यक्त केली.

## ◆ थोडक्यात...

### बलात्कार खटल्यातील विलंबा मुळे निकाल येतो एका पिढीनंतर: राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

नवी दिल्ली । वृत्तसंस्था



बलात्कारासारख्या पाशवी गुह्यांतील न्यायालयीन निकालांना होणाऱ्या विलंबामुळे न्यायालयीन प्रक्रियेत संवेदनशीलतेचा अभाव आहे असा समज सर्वसामान्यांच्या मनात बळावत जातो, असे सांगत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी न्यायव्यवस्थेतील स्थगिती संस्पृतीत बदल करण्याचे आवाहन रविवारी येथे केले. महिलांवरील अत्याचारांच्या वाढत्या घटनांच्या संदर्भात राष्ट्रपतींनी गेल्या काही दिवसांत दुसऱ्यांदा केलेले हे मतप्रदर्शन म्हणजे सरकारच्या कारभारावरील नाराजी मानली जात आहे. जिल्हा न्यायपालिकेच्या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या समापन सत्राला संबोधित करताना त्या म्हणाल्या की, जेव्हा बलात्कारासारख्या अमानुष गुह्यातील न्यायालयीन निकाल एक पिढी उलटून गेल्यानंतर येतात, तेव्हा न्यायालयीन प्रक्रियेत संवेदनशीलतेचा अभाव असल्याचा सामान्य माणसाचा समज दृढ होतो. अशा अमानुष गुह्यांतून वाचलेल्या महिलांना समाजाकडून पाठिंबा मिळत नसल्याबद्दलही त्यांनी चिंता व्यक्त केली. पीडित महिलांची परिस्थिती अगदी दयनीय आहे. सर्वात वाईट आहे कारण समाजातील लोकही त्यांना पाठिंबा देत नाहीत, अशी अनुकंपा राष्ट्रपतींनी व्यक्त केली.

### निषादच्या 'उंच उडी' सह भारत पुन्हा चंदेरी दुनियेत




पॅरिस । वृत्तसंस्था

भारतीय पॅरालिम्पियन आणि उंच उडीपटू निषाद कुमार याने पॅरिसमध्ये ऐतिहासिक कामगिरीची नोंद केली आहे. हंगामातील सर्वोत्तम कामगिरीसह निषाद याने भारताच्या खात्यात आणखी एका रौप्य पदकाची भर घातली. टोकियोतील पहिल्या पॅरालिम्पिक स्पर्धेत रौप्य पदक पटकवणाऱ्या निषाद कुमार याने सलग दुसऱ्यांदा जगातील मानाच्या स्पर्धेत भारताची मान उंचावणारी कामगिरी करुन दाखवली आहे.

### माजी नगरसेवक वनराज आंदेकरांचा मर्डर, आरोपींची नावे समोर

पुणे । प्रतिनिधी



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांची भर चौकात हत्या करण्यात आली आहे. या हत्येमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालं आहे. पुण्यातील नाना पेठ येथील डोके तालमीच्या समोर वनराज आंदेकरांवकर गोळ्या झाडण्यात आल्या. इतकंच नाहीतर आरोपींनी गोळ्या घालून झाल्यावर कोयत्यानेही त्यांच्या सपासप वार केले. या प्रकरणातील वनराज आंदेकर यांच्यावर हल्ला करणाऱ्या संशयित आरोपींची नावे समोर आली आहेत. वनराज आंदेकर यांच्या हल्ला करणाऱ्या आरोपींमध्ये गणेश कोमकर, सोमनाथ सयाजी गायकवाड आणि तुषार आबा कदम यांची नावे समोर आली आहेत. गणेश कोमकर हा कुख्यात गुंड बंडू उर्फ सुर्यकांत आंदेकर याचा जावई असल्याची माहिती समजत आहे.

# क्रॉप इन्शुरन्स ॲपवर नुकसानीची तातडीने नोंदणी करा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आ.संदीप क्षीरसागरांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात दोन दिवसांपासून पावसाची संततधार सुरू आहे. त्यामुळे शेतातील पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. या नुकसानीची माहिती बीड मतदारसंघासह जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी तातडीने क्रॉप इन्शुरन्स ॲपवर करावी असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

संपूर्ण बीड जिल्ह्यात मागील दोन दिवसांपासून सतत जोरदार पाऊस सुरू आहे. झालेल्या पावसाने जिल्ह्यातील सर्व जलसाठे जवळपास संपूर्ण भरलेले आहेत. परंतु या पावसामुळे शेतातील सर्व प्रकारच्या पिकांचे मात्र मोठे नुकसान ..

(उर्वरित पान २ वर)

▶ तांत्रिक अडचणींबाबत प्रशासनाने काळजी घ्यावी



बऱ्याच वेळा पीक पाहणी, नुकसानीची नोंदणी करताना संबंधित पोर्टल तसेच पवर सर्वर डाउन तसेच इतर तांत्रिक अडचणी शेतकरी बांधवांना येत असतात. नुकसानीची माहीती देण्याचा कालावधी हा ७२ तासांचा आहे. या अनुषंगाने प्रशासनाने विमा कंपनी व संबंधित कार्यान्वित पोर्टल कंपनी यांच्याकडे समन्वय साधून तत्सम प्रकारच्या अडचणी निर्माण होणार नाहीत. याची काळजी घेण्याच्या सुचना आ.क्षीरसागर यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

# शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी पात्रुड येथे दोन तास रास्ता रोको आंदोलन

▶ वाहनांच्या लांबच लांब रांगा

पात्रुड। प्रतिनिधी



खरीप २०२० चा प्रलंबित पीकविमा तात्काळ वाटत झाला पाहिजे, खरीप २०२३ व रब्बी २०२३-२४ चा पीकविमा सरसकट सर्वांना मिळाला पाहिजे, ई-पीक पहाणीची अट रद्द करून सोयाबीन, कापसाचे अनुदान सरसकट सर्वांना तात्काळ वाटप झाले पाहिजे, शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी झाली पाहिजे, कापसाला दहा हजार आणि सोयाबीनला सात हजार हमीभाव मिळाला पाहिजे, शेतात जाण्यासाठी पाणंद रस्ते झाले पाहिजेत, गुजरवाडी ते शेंडगे वस्ती व गुजरवाडी ते सातपुते वस्ती रस्त्याचे मजबुतीकरण झाले पाहिजे, शिंदेवाडी येथील पुलाचे काम तात्काळ चालु झाले पाहिजे, लहामेवाडी गावचा रस्ता चांगल्या दर्जाचा झाला पाहिजे, भगवान नगर रस्त्याचे काम तात्काळ चालु झाले पाहिजे, टालेवाडी येथील प्रलंबित ३३ केव्ही सब स्टेशन झाले पाहिजे, राजेवाडी येथील ...

(उर्वरित पान २ वर)

# चिखलयुक्त झालेली बाजारपेठ चिखलमुक्त करण्यासाठी ग्रामपंचायत पुढाकार घेणार का?

**खासदार, आमदारांनी नेकनुरच्या बाजारपेठेकडे लक्ष घालण्याची गरज**

नेकनूर । प्रतिनिधी

नेकनूरच्या मुख्य बाजारपेठेत पावसाळ्यात अक्षरशा चिखलामुळे नागरिकांना खरेदीला येणे मुश्किल झाले आहे. नागरिकांना हा त्रास होत असल्यामुळे व्यावसायिकांना त्याची झळ सोसावी लागत आहे याच्यामुळे बाजारपेठेवर परिणाम झाल्याचे जाणवत असून निवडणुका जवळ आल्या की खासदार, आमदार ते जिल्हा परिषद सदस्य ,पंचायत समिती सदस्य, सह सरपंच ,ग्रामपंचायत सदस्य चुकीचे आश्वासने देऊन जनतेला अधिक गैरसोईकडे ढकलू नका तर वस्तुस्थिती समजून घेऊन व्यक्त व्हा अशी भावना व्यापारी वर्गात व जनतेत उमटत आहे.

नेकनूर हे शहर तालुका नसले तरीही तालुक्याला कमी नाही नेकनुर ची बाजारपेठ म्हणजे ८० ते ९० खेडेगावांचा या बाजारपेठेशी जुळलेली नाळ व



अर्थव्यवस्था अवलंबून आहे. नेकनुर चा राजकीय पुढाऱ्यांनी बाजारपेठेच्या नावावर राजकारण करून व्यापारी वर्ग व जनतेशी खेळ मांडून पूर्ण बाजारपेठ चिखलयुक्त केली आहे. नागरिकांना हक्काचा आलेला निधी मात्र...

(उर्वरित पान २ वर)

# स्व. विनायकराव मेटे यांना उत्कृष्ट संसदपटूचा पुरस्कार जाहीर

● विनायकराव मेटे यांच्या निधनानंतर होणार त्यांच्या अविस्मरणीय कार्याचा गौरव
● लोकनेत्यास विधिमंडळाने दिली कामकाजाची पावती
● मा.राष्ट्रपती यांच्या हस्ते होणार पुरस्कार वितरण सोहळा
● पत्नी डॉ. ज्योती मेटे स्वीकारणार पुरस्कार



बीड । प्रतिनिधी

राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे सन २०२०-२१ करिता महाराष्ट्र विधानपरिषद उत्कृष्ट संसदपटू पुरस्कारासाठी माजी विधानपरिषद सदस्य स्व.विनायकराव मेटे यांची निवड जाहीर करण्यात आली. राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे महाराष्ट्र विधानमंडळाच्या मा. सदस्यांना सन २०१८-१९ ते २०२३-२४ या कालावधीसाठी देण्यात येणाऱ्या उत्कृष्ट संसदपटू व उत्कृष्ट भाषण या पुरस्कारांसंदर्भात पुरस्कार वितरण सोहळा कार्यक्रम मंगळवार, दिनांक ०३ सप्टेंबर, २०२४ रोजी दुपारी ०३.३० वाजता मध्यवर्ती सभागृह, विधान भवन, मुंबई येथे मा. राष्ट्रपती महोदयांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे आणि मा.पीठासीन अधिकारी यानी दिलेल्या निदेशानुसार लोकनेते विनायकराव मेटे यांच्या सुविद्य पत्नी तथा शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ.ज्योती विनायकराव मेटे या हा पुरस्कार स्वीकारणार आहेत.

स्वर्गीय विनायकराव मेटे हे केवळ एक राजकीय नेते नव्हते, तर समाजाच्या कल्याणासाठी अखंड झटणारे एक खऱ्या अर्थाने लोकनेते होते. समाजाच्या विकासासाठी त्यांची असलेली निस्सीम तळमळ आणि अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी त्यांनी घेतलेले धाडसी निर्णय हे नेहमीच प्रेरणादायी ठरले आहेत. अखिल भारतीय मराठा महासंघातून सामाजिक व राजकीय जीवनास सुरुवात करणारे स्वर्गीय विनायकराव मेटे साहेबांनी स्व.अण्णासाहेब पाटलाच्या विचारांनी प्रेरित होत मराठा आरक्षण विषय सातत्याने लावून धरला १९९६ मध्ये विधान परिषद सदस्यपदी त्यांची प्रथम नियुक्ती झाली. त्यानंतर पाच वेळा विधानपरिषद सदस्य म्हणून त्यांनी विधान परिषदेत काम केले. विधिमंडळात मराठा आरक्षणासह धनगर आणि मुस्लिम समाजाच्या आरक्षणासाठी त्यानी आवाज उठवला यासोबतच प्रथमच शेतकऱ्याच्या कर्जमाफी संदर्भात विधिमंडळात आवाज उठवला , अवघ्या हिंदुस्थानचे दैवत असलेले स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे अरबी समुद्रातील स्मारकाची संकल्पना मांडून त्याचा अविरत पाठपुरावा केला. ...

(उर्वरित पान २ वर)

# पावसाचा जोर कमी होताच शेती पिकांचे पंचनामे करण्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांचे निर्देश

**शेती पिकांच्या नुकसानीची माहिती शेतकऱ्यांनी विमा कंपनीस विहित मर्यादेत कळवावी : मुंडेंचे आवाहन**

मुंबई । प्रतिनिधी

संपूर्ण बीड जिल्ह्यात ३१ ऑगस्ट पासून ते आतापर्यंत सातत्याने सर्वदूर पाऊस पडत असून जिल्ह्यातील जवळपास सर्वच जलाशय तुडुंब भरून नदी-नाले खळखळून वाहू लागले आहेत. जिल्ह्यावरील जलसंकट दूर झाल्याची बातमी जरी आनंददायक असली, तरी सततच्या पावसाने अतिवृष्टी व काही ठिकाणी पुराचा धोका निर्माण झाला असून त्यामुळे खरीप हंगामातील शेती पिके धोक्यात येण्याची शक्यता आहे. तर काही महसूल मंडळांमध्ये २४ तासांमध्ये अतिवृष्टीच्या निकषांप्रमाणे किंवा त्यापेक्षा अधिक पाऊस पडला असून, राज्य शासनाच्या महसूल विभागाने यापूर्वीच काढलेल्या आदेशाला अनुसरून महसूल व कृषी विभागाने पावसाचा जोर कमी होताच शेती पिकांच्या तसेच घरांच्या पडझडीच्या आदी नुकसानीचे तातडीने वस्तुनिष्ठ पंचनामे करावेत व शेती पिकांच्या ३३% च्या मर्यादेपेक्षा जास्त नुकसानीचे अहवाल राज्य शासनाकडे मदतीच्या मागणीसह तातडीने पाठवावेत असे निर्देश जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी जिल्हा प्रशासनाला दिले आहेत.

बीड जिल्ह्यातील बहुतांश शेतकऱ्यांनी खरीप हंगामात एक रुपयात पिक विमा योजनेत सहभाग घेतला असून आपल्या शेती पिकांच्या झालेल्या नुकसानीची माहिती विमा कंपनीच्या नियमानुसार विमा कंपनीला देखील निर्धारित वेळेत कळवावी, जेणेकरून बाधित शेतकऱ्यांना पीक विम्याचे ही संरक्षण लागू राहील, असेही आवाहन पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी केले आहे.

दरम्यान सध्या जिल्ह्यात सर्वदूर सुरू असलेल्या पावसामुळे जिल्ह्यातील जवळपास सर्वच लहान मोठे जलाशय पूर्ण क्षमतेने भरले असून त्याउपर नद्यांमधून व नाल्यांमधून पाणी वाहत आहे. पावसाचा जोर आणखी पुढील २४ तास जर इतकाच प्रखर राहिला तर काही नद्या धोक्याची पातळी ओलांडू शकतात .



CMYK

## ◆ संपादकीय...

## तुझ्या शेतात राबून माझी सरली हयात! लाडक्या सर्जाला सजवण्यासाठी शेतकरी सज्ज



आज धार्मिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आहे. वर्षांमागून वर्षे सरल्यानंतर यंदा या दिवशी म्हणजेच सोमवारी श्रावण महिना संपतोय. याच दिवशी पिठोरी अमावस्या आहे आणि याच दिवशी शेतकरी राजासाठी महत्त्वाचा असलेला बैलपोळा सणही साजरा होईल. त्यानिमित्तानं बाजारपेठेत बैलांसाठी सुंदर सुंदर असं सजावटीचं साहित्य आलंय.

वर्षभर आपल्याला साथ देणाऱ्या बैलांना या सणानिमित्त शेतकरी मोठ्या उत्साहानं सजवतात. त्यांच्या शृंगारासाठी सध्या बाजारात खरेदीची लगबग पाहायला मिळतेय.

कवड्यांच्या माळा, घागर माळा, झुले, विविध प्रकारचे कंडे, गोंडे, चंगाळी, बैलाच्या शिंगांना देण्यासाठी रंग, इत्यादींची बाजारात खरेदी केली जाते. शेळीची कंडे ३०, वासरूचे कंडे १०० आणि गायी, बैलाचे कंडे १५० ते २०० रुपयांना मिळतात. तर, संपूर्ण साज १ हजार रुपयांना मिळतो.

बैल पोळ्याच्या आदल्या दिवशी बैलाच्या खांद्याला हळद आणि तुपानं शेकतात. त्यांच्या पाठीवर नक्षीकाम केलेली झूल, सर्वांगावर गेरुचे ठिपके, शिंगांना बेगड, डोक्याला बाशिंग, गळ्यात कवड्या, घुंगरांच्या माळा, नवी वेसण, नवा कासरा, पायात चांदीचे किंवा करदोड्याचे तोडे घालतात. गोड पुरणपोळी आणि सुग्रास अन्नाचा नैवेद्य बैलांना दाखवला जातो. प्रत्येक शेतकरी आपल्या ऐपतीप्रमाणे बैलांचा साजशृंगार करतो. बैल सजवून त्यांची मिरवणूक काढली जाते. या दिवशी महाराष्ट्रातील अनेक गावांमध्ये प्रत्येक घराला आंब्याच्या पानांचं तोरण बांधलं जातं. गावातल्या सर्व बैलजोड्या, वाजंत्री, सनई, ढोल, ताशे वाजवत एकत्र आणल्या जातात. अशाप्रकारे उत्सव साजरा केला जातो.

# बैल पोळा



महाराष्ट्रातील लोक पिठोरी अमावस्या ला बैलपोळ्याच्या उत्सव साजरा करतात. हा सण छत्तीसगडमध्ये देखील प्रसिद्ध आहे. या दिवशी पशुधनाची पूजा केली जाते. एकीकडे जिथे बैलांची पूजा केली जाते तर दुसरीकडे स्वादिष्ट व्यंजन बनवून त्यांचा आस्वाद घेतला जातो. यासोबतच या दिवशी बैलांना सजवण्याची प्रतियोगिता देखील आयोजित केली जाते. पोळा सणाची शहरापासून तर गावापर्यंत धूम असते. परंतु या सणाचे विशेष आकर्षण गावांमध्येच पहावयास मिळते. गावातील शेतकरी सकाळपासूनच बैलपोळ्याच्या तयारीला सुरुवात करून देता. सकाळी लवकर उठून बैलांना आंघोळ घातली जाते यानंतर त्यांना सजवून त्यांची पूजा केली जाते. घरातील स्त्रिया स्वादिष्ट व्यंजन, पुरणपोळी व शिरा बनवतात. या दिवशी बैलांना पुरणपोळीचे जेवण दिले जाते. च्या घरात बैलजोडी नसते ते लोक माती व लाकडाचे बैल देखील पूजतात.

बैलपोळ्याचा सण शेतीवर आधारित सण आहे. हा सण आपल्या बैलांचे व शेती तसेच शेतकऱ्याच्या कामी येणार्या प्राण्यांची महत्त्व सांगतो. निसर्ग, मनुष्य आणि सर्व प्राणिमात्रांमध्ये देव आहे व यांची पूजा हीच देवाची पूजा होय, याची जाणीव हा सण आपणास करवून देतो. श्रावण महिन्याची सुरुवात होताच अनेक सण उत्सवांची रेलचेल सुरू होते. पावसाचे दिवस असल्याने सृष्टीचे सौदर्यही खुलून दिसते. अश्या या श्रावणात नागपंचमी, नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, गोकुळाष्टमी या सणांनंतर सरत्या श्रावणात येतो बैल पोळ्याचा सण. संपूर्ण महाराष्ट्रात आजही मोठ्या उत्साहाने साजरा केला जाणार हा सण. शेतकरी बांधवांसाठी पोळा सणाचे महत्व खूप आहे.

बैलपोळ्याचा दिवस शेतकऱ्यांची बैलांविषयी असलेली कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस होय. वर्षभर शेतात कष्ट करून राबणाऱ्या आणि शेतकऱ्याचा खांद्याला खांदा लावून शेतीत मदत करणाऱ्या बैलाला या दिवशी पुजले जाते. बैलपोळ्याच्या दिवशी सर्वात आधी शेतकरी भल्या पहाटे उठून बैलांच्या गळा आणि नाकातील दोर काढतात. यानंतर त्यांना आंघोळ घालून तयार केले जाते. जर जवळपास नदी अथवा तलाव असेल तर त्या ठिकाणी अंघोळीसाठी नेले जाते. अंघोळ घातल्यानंतर शेतकरी लोक आपल्या बैलांना छान सजवतात. त्यांच्या शिंगांना रंग लावून अंगावर झुल घातली जाते.

यादिवशी बैलांना पुरणपोळी चे जेवण असते. काही ठिकाणी बाजरी ची खिचडी सुद्धा बैलांना खाऊ घातली जाते. यादिवशी सर्व शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असते. सायंकाळच्या वेळी गावातील सर्व लोक आपापल्या बैलांना घेऊन गावाच्या मोकळ्या चौकात जमतात. बैलपोळ्याच्या दिवस शेतकरी आणि शेतात काम करणारे बैल व इतर सर्व प्राण्यांच्या विश्रांतीचा दिवस असतो. म्हणून या दिवशी कोणतेही काम केले जात नाही. यानंतर संध्याकाळच्या वेळी घरातील महिला आपापल्या बैलाची आरती ओवाळून पूजा करतात. ढोल ताशांच्या गजरात त्यांची मिरवणूक काढली जाते.

भारतीय संस्कृती मनुष्या सोबतच निसर्ग आणि प्राणीमात्रांची देखील पूजा करायला शिकवते. आपल्या धार्मिक ग्रंथांमध्ये बैलपोळ्याची एक प्राचीन कथा देखील पहावयास मिळते. या कथेनुसार एकदा भगवान शंकर आणि देवी पार्वती सारीपाठ चा खेळ खेळत असतात. त्यावेळी देवी पार्वतीने खेळाचा डाव जिंकला परंतु भगवान शंकर म्हणाले की हा खेळ मी जिंकला. या विषयावरून दोघांमध्ये वाद सुरू झाला. या खेळाचा साक्षी म्हणून समोर भगवान शंकराचा नंदी बसलेला होता. त्यावेळी शंकरांनी नंदी ला विचारले की तू सांग डाव कोणी जिंकला. नंदिने शंकराची बाजू घेत त्यांनी जिंकला म्हणून सांगितले. त्यावेळी देवी पार्वतीने रागात येऊन नंदीला शाप दिला की पृथ्वीलोकावर तुझ्या मानेवर जू बसवण्यात येईल व तुला खूप कष्ट करावे लागेल. हा श्राप ऐकून नंदीला त्याची चूक लक्षात आली व त्याने देवी पार्वतीची क्षमा मागितली. यानंतर देवी पार्वतीने त्याला माफ करीत एक वरदान दिले की जरी तुला कष्ट करावे लागत असले तरी वर्षातून एक दिवस तुझ्यासाठी आनंदाचा राहील. या दिवशी तुझी देवा प्रमाणे पूजा केली व तुला छान छान भोजन खाऊ घालण्यात येईल आणि हाच तो बैलपोळ्याच्या दिवस तेव्हापासून पोळ्याच्या दिवशी बैलांची पूजा केली जाते.

पोळा हा सण बैलांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा सण आहे. महाराष्ट्रात हा सण सर्वत्र साजरा केला जातो. भारतीय शेतकयाला त्याच्या शेतीच्या कामात बैलांचा खूप उपयोग होतो. बैल वर्षभर शेतात कष्ट करतो. त्याच्यामुळे आपल्याला अन्न मिळते. बैल आपला पोशिंदा आहे.

त्याचा मान राखण्यासाठी हा सण साजरा केला जातो. म्हणून या सणाला 'बैलपोळा' असेही म्हणतात. पोळा हा सण श्रावणातल्या अमावस्येला साजरा केला जातो. या दिवशी बैलांच्या कष्टांना सुट्टी असते. त्यांना त्या दिवशी मनसोक्त चरण्यासाठी माळरानावर सोडले जाते. आंघोळ घालून सजवले जाते. त्याला ओवाळून त्याची पूजा केली जाते. त्याला वरणापुरणाचे जेवण जेवू घातले जाते. नंतर त्याची मिरवणूकही काढली जाते

हा सण म्हणजे बैलाचा सत्कारच असतो. शेतकरी हा सण मोठ्या कृतज्ञतेने व अत्यंत आनंदाने साजरा करतात... बैल पोळ्याच्या सर्वांना शुभेच्छा...!

**– शिवभक्त अजय कदम पाटील**

# महाराज माफ करा...



छत्रपती शिवाजी महाराज आपण आमचे श्वास आहात. आपला पुतळा कोसळला. मनाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या झाल्या महाराज. देशाच्या पंतप्रधानांनी माफी मागीतली. बरे झाले. उशीरा का होईना माफी मागितली त्यांनी. ही माफी राजकीय होय. लोकसभेत महाराष्ट्रात पिछेहाट झाली. आता विधानसभा आहेत. राज्यातील जनता भाजपाला हात दाखणार हे नक्की. याच धाकातून मोदीनी माफी मागीतली. राज्यपालांनी छत्रपतींचा अपमान केला. महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांचा अपमान केला तेव्हा कुठे गेले होते मोदीजी ?

मुख्यमंत्री म्हणाले, सागरी वाऱ्याने छत्रपतीचा पुतळा कोसळला. मग बाजूचे झाड उभे कसे ? मा. शरद पवार यांनी प्रश्न केला आहे की, गेट वे इंडिया येथील शिवछत्रपतींच शिल्प सागरी किना-यावर आहे. गेली ५० वर्षे उभे आहे. लोकांना प्रेरणा देत आहे.

भाजपा खासदार नारायण राणे म्हणतात. नैसर्गिक कारणाने पुतळा पडला ! बांधकाम मंत्री म्हणतात, खाऱ्या वाऱ्याने गंज लागुन पुतळा पडला. मुख्यमंत्री म्हणतात ताशी ४५ किमी वेगाने वारे होते. गृहमंत्री म्हणतात, पुतळा नौदलाने बांधला. फडणवीस खोटे बोलत आहेत. पुतळा जर इंडियन नेव्हिने उभारला होता तर मग नेव्हीचे दोन डिझाइन डावलून जगदिप आपटेचेच तीसरे डिझाइन अचानक कसे काय फायनल झाले.

पुतळ्याची जबाबदारी ही पुर्णपणे राज्य सरकारची आहे. हे ते नाकारू शकत नाहीत. राज्यात कुठेही कुणाचाही पुतळा उभारायचा असल्यास राज्य सरकारची परवानगी घ्यावी लागते. येथे पुतळ्याच्या उद्घाटना साठी प्रामुख्याने राज्य सरकारचे प्रतिनिधी तसे स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी अनावरण करण्यासाठी आले होते. त्यामुळे जबाबदारी राज्य सरकारची आहे. पण शासनकर्त बेजबाबदारपणे जबाबदारी झटकवत आहेत.

गेट वे ऑफ इंडियाचा छत्रपती शिवाजी महाराजांचा स्व. यशवंतराव चव्हाणांच्या हस्ते लोकार्पण झालेल्या पुतळ्याची आजही उत्तम स्थिती आहे. मोदींच्या हस्ते अनावरण झालेला पुतळा आठ महिन्यात कोसळला. ही आहे महायुती सरकारच्या निकृष्ट कामाची गॅरंटी.३० नोव्हेंबर १९५७ साली पंडीत जवाहरलाल नेहरूंच्या हस्ते उभारलेला छत्रपतींचा पुतळा अजूनही ठणठणीत आहे.

खोटे पण रेटून बोल असे आहेत पंतप्रधान व राज्याचे गृहमंत्री. राहुल गांधी म्हणतात पंतप्रधानांबाबत माझी अडचण ही आहे की, ते कुणाचच ऐकत नाहीत. सुरुवातीपासूनच आपण बरोबर असल्याचे गृहित धरणाऱ्या कोणत्याही व्यक्तीची मला समस्या आहे. त्यांना जरी ते चुकीचे आहेत अस कुणी सांगितल तरी ते ही बाब मान्य करणार नाहीत. त्यामुळे या प्रकारची व्यक्ती नेहमीच काही ना काही समस्या निर्माण करते

भाजपा छत्रपतींचे नाव घेवून २०१४ साली सत्तेत आले, अरबी समुद्रात महाराजांचे स्मारक उभारण्यासाठी मोठ्या थाटात पंतप्रधानानी जलपूजन केले. आत्तापर्यंत कोट्यावधी रू. शासनाच्या तिजोरितून खर्च झाले. पण अद्याप काम सुरू नाही. छत्रपतींच्या नावाचा फक्त वापर केला जातो, याचा हिशोब जनता मागत आहे.

महाराजांनी जिंकलेले गड किल्ले अजून साबूत आहेत आणि पुतळा आठ महिन्यात कोसळला.

महाराज माफ करा. आपण म्हणाला होतात, शेतक-यांच्या केसाला धक्का लागला तर कडेलोट करील. महाराज रोज शेतकरी आत्महत्या करतायेत.

महाराज माफ करा. मुलींचे संरक्षण केले जात नाही. २ वर्षाच्या मुली पासून ७० वर्षाच्या वृद्ध महिलेवर लैंगीक अत्याचार होत आहेत. कल्याणच्या सुभेदाराची सून आपण सन्मानपूर्वक परत पाठवली. महाराष्ट्राचे सत्ताधारी गुलाबी जॅकेट घालून प्रचारात मग्न आहेत.

खा. कंगना राणौत म्हणाली, शेतकरी आंदोलनात महिलांवर अत्याचार झाले त्या कंगनाला भाजपाने खासदार केले. मुळात महाराज, आपण धर्म निरपेक्ष होतात. रयतेचे राजे होतात. जातविरहित कारभार आपण केलात. आपला अपमान झाला होताच. राज्याभिषेक करण्यास मनुवाद्यांनी नकार दिला होता आपल्याला. तेच मनुवादी म्हणजे भाजप, आर. एस. एस. स्वातंत्र्य लढ्यापासून आरएसएस दूर होती. इंग्रजांची माफी मागून त्यांना मदत करणारी ही मनुवादी अवलाद. देश स्वतंत्र झाल्यापासून त्यांना चतुवर्ण व्यवस्था पुन्हा मजबूत करायची आहे. सत्तेसाठी धर्माधर्मात भांडणे लावणे ही त्यांची नीती आहे. आपले रयतेच्या राजाचे विचार भाजपाला मान्य नाहीत. महात्मा ज्योतिबांनी आपणास गुरु मानले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी महात्मा ज्योतिबांना गुरू मानले. हा सामाजिक समतेचा, धर्मनिरपेक्षतेचा विचार त्यांना संपवायचा आहे. त्यांना घटना संपवायची आहे. लोकशाही संपवायची आहे. कृतीने भाजपा दररोज आपली मुल्ये पायदळी तुडवत आहेत.

राममंदिराच्या कामात भ्रष्टाचार केला. भाजपाचे सरकार केंद्रात व राज्यात आहे. राममंदिर गळते आहे. सत्ते साठी श्रीरामाच्या नावाचा वापर आपल्याही विचारांना संपवण्याचे कटकारस्थान दोन्ही सरकारे करत आहेत.

पण महाराज, जनता आता जागी झाली आहे. आपल्या अपमानाचा बदला आम्ही नक्की घेवू. आशीर्वाद असू द्या महाराज, जय शिवराय, जय ज्योती, जयभीम..

**– अँड उषा दराडे , माजी आमदार ,
विधान परिषद सदस्या**

## ◆ पान १ वरुन पुढे...

## क्रॉप इन्शुरन्स ॲपवर..

झाले आहे. सर्व शेतकरी बांधवांनी पिक विमा भरला आहे. परंतु विमा मिळण्याकरिता झालेल्या नुकसानीची माहिती ७२ तासांच्या आत क्रॉप इन्शुरन्स पवर भरणे आवश्यक आहे. त्यामुळे बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील तसेच संपूर्ण बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी झालेल्या नुकसानीची माहिती क्रॉप इन्शुरन्स पच्या माध्यमातून विमा कंपनीकडे नोंदवावी जेणेकरून पीक विमा मिळेल. असे आवाहन बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

## शेतकऱ्यांच्या विविध...

कुंडलिका नदीवरील बंधारा तात्काळ दुरुस्त झाला पाहिजे व केंडे पिंपरी येथे नवीन बंधारा बांधला पाहिजे, पात्रुड गावचे गावठाणा फिडर तात्काळ चालु झाले पाहिजे, पात्रुड ते घळाटवाडी रस्त्याचे रुंदीकरण व मजबुतीकरण झाले पाहिजे या आणि अशा वेगवेगळ्या मागण्यांसाठी शुक्रवार दि. ३० ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी १० वा. लोणगाव फाटा, पात्रुड येथे शेतकरी नेते ॲड भाई नारायण गोले पाटील, नौमानभाई चाऊस, बालासाहेब येवले, फजलुभाई पटेल व नितीन येवले यांनी या आंदोलनाचे आयोजन केले होते. यावेळी पात्रुड, लऊळ, ढोरगाव, लोणगाव, भगवान नगर, गुजरवाडी, शिंदेवाडी, लहामेवाडी, टालेवाडी व परिसरातील शेतकरी बांधव व शेतकरी पुत्र मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित माजलगाव तहसील प्रशासनाला मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. आंदोलन स्थळी पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त राखला.

## चिखलयुक्त झालेली..

सोयीनुसार तोंडाला पाने पुसली जावी तसा उधळपट्टी करून कार्यकर्ते लाभार्थी केले जातात. जरा चिकलयुक्त बाजारपेठेत पुढाऱ्यांना वेळ असेल तर प्रत्यक्षात एकदा व्यापारी वर्गाला रोज भेडसावणारा त्रास जाऊन बघून यावे. पाऊस आला की चिकल दुकानात अशी अवस्था झाली आहे नेकनुरच्या व्यापारी वर्गाची. निवडणुकीच्या तोंडावर खोटी आश्वासने देऊन जनतेला वेड्यात काढणे थांबवा आता तरी जनतेची व व्यापाऱ्यांची मागणी लक्षात घेता खासदार आमदार जि प सदस्य सरपंच ग्रामपंचायत सदस्य यांनी खोट्या प्रसिद्धीचा चिखल डोळ्यातला काढून नेकनुर च्या बाजारपेठे मधील चिखल कसा काढता येईल व विकास करता येईल हे पहावे. सत्तेचा वापर जनतेचे मूलभूत प्रश्न मार्गी लावण्यासाठी झाला पाहिजे मात्र तो केवळ भूलथापा देण्यात झाला असल्याचे व्यापारी वर्गातून व नागरिकांतून बोलले जात आहे.

## स्व. विनायकराव मेट...

मागासवर्गीय तरुणांना रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी मागासवर्गीय औद्योगिक संस्थांचे प्रश्न विधानभवनात मांडले तसेच मराठा समाजातील होतकरू विद्यार्थ्यांना उच्च व परदेशी शिक्षणाकरिता विद्या वेतन व मार्गदर्शनाकरिता सारथी या स्वायत्त संस्थेच्या स्थापनेची संकल्पना मांडली व त्याद्वारे असंख्य विद्यार्थ्यांना लाभ मिळवून दिला. पोलीस भरतीतील उमेदवारांसाठी वयोमर्यादा वाढविण्यासाठी यशस्वी पाठपुरावा केला. अशा संघर्षशील व्यक्तिमत्त्वाचा मराठा आरक्षणाच्या बाबतीत आयोजित महत्त्वपूर्ण बैठकीसाठी मुंबईकडे जात असताना दुर्दैवी निधन झाले. उभ्या हयातभर मराठा आरक्षणासाठी लढा देणाऱ्या मेटे साहेबांचा शेवटही मराठा आरक्षणासाठीच झाला. समाजातील वंचित आणि दुर्लक्षित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य अर्पण केले. त्यांच्या विचारांनी आणि कार्याने राज्याला आणि देशाला एक नवा मार्ग दाखवला आहे. त्यांच्या योगदानाची आठवण कायम आपल्या हृदयात जिवंत राहील. आज त्यांच्या पश्चात त्यांचा हा सन्मान होणार आहे. त्यांच्या पत्नी शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ.ज्योती विनायकराव मेटे या हा पुरस्कार स्वीकारणार आहेत.

## ◆ पान ४ वरुन पुढे...

## माजलगावात कोयत्याने...

गल्यातील नगदी रक्कम २हजार ,५००रु.हिसकावून आरोपी पळुन गेले. अश्या आशयाच्या फिर्याद वरुन उल्लेखित नामे आरोपी विरोधात भान्यासं -२०२३चे कलम ३५१(२), ३११,३२४(४) ,३०९ (६),३(५)सह शस्त्रास्त्र बंदी कायद्याच्या कलम ४/२५अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले असुन पुढिल तपास सपोनि. मुंडे करीत आहेत. दुसऱ्या हल्ला प्रकरणी पिडीत फिर्यादी अनिस हैदर बेग ,मिर्झा किराणा अँड डेलीनिडस् चे मालक रा.गांधनपुरा, माजलगाव यांनी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी नुसार प्रकरणातली आरोपी शेख शेरखान उर्फ बब्बु नजीर हा ३०आगस्ट रोजीच्या सकाळी ६:३०वा. त्यांच्या दुकानावर आला आणि हातातील कोयत्याचा धाक दाखवून दमदेऊन सामानाची मागणी करु लागला आणि अनिस बेग यांनी फुकट सामान देण्यास नकार दिला असता शेख शेरखान याने शिविगाळ सुरु केली. यावर अनिस हे दुकानातुन बाहेर आले आणि कशासाठी फुकट सामान द्यायचे असे म्हणताच शेख शेरखान याने कोयत्याने हल्ला करण्याचा प्रयत्न केला असता तो कोयता अनिस बेग यांनी हाताने आडवला यात ते गंभीर जखमी झाले. याचाच गैरफायदा घेऊन शेख शेरखान याने गल्यातील नगदी रक्कम ३हजार रु.हिसकावुन नेले पण अनिस बेग यांनी शेख शेरखान याच्या हातातील कोयता हिसकावून तो पोलीस ठाण्यात जमा केल्याची माहिती समजली आहे. प्रकरणात अनिस यांच्या फिर्याद वरुन उपरोक्त नमुद आरोपी विरोधात भान्यासं -२०२३चे कलम ३५१(२), ३२४(४), ३११सह शस्त्रास्त्र बंदी कायद्याच्या कलम ४/२५प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढिल तपास पोउपनि.माकणे करीत आहेत.

## या वर्षीचा आदर्श पुरस्कार..

करणारे गेवराईचे भुमिपूत्र अविनाश कांबीकर यांचा सत्कार करण्यात येणार आहे .प्रतिष्ठानच्या १६ व्या आदर्श शिक्षक पुरस्काराचे मानकरी जि.प.प्रा.शाळा राजपिंप्रीचे मुख्याध्यापक धनंजय सुलाखे, जि.प.प्रा. शाळा अर्धपिंप्रीचे शिक्षक डॉ.राहुल घाडगे, जि.प.प्रा. शाळा आम्लाचे शिक्षक भारत काकडे, जि.प.प्रा. शाळा मुधापूरीच्या शिक्षिका श्रीमती रंजना गायसमुद्रे, मोहिमाता विद्यालय मादळमोहीचे शिक्षक गुलाब शेख, जि.प.प्रा.शाळा नागरे वस्तीचे शिक्षक भगवान नागरे, जि.प. माध्यमिक शाळा उमापूरचे शिक्षक धर्मराज करपे, जि.प.प्रा. शाळा तळणेवाडीचे शिक्षक डॉ.संजय पांढरे, जय भवानी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य वसंत राठोड, जि.प.प्रा. शाळा माळापूरी, ता.बीडचे शिक्षक ब्रम्हनाथ घोडके आणि जि.प.प्रा. शाळा हरकी निमगाव, ता.माजलगावचे शिक्षक लक्ष्मण सरवदे हे गुरुजन ठरले मानकरी.

## माजीमंत्री सुरेश धस...

राम धुमाळ,सरपंच बंडा बोरुडे, केशव चव्हाण,संजय मनोज गाढवे,संजय गाढवे,विजय गाढवे,सरपंच संदीप मार्कंडे, प्रल्हाद मुळीक,सरपंच सावता ससाणे,दीपक कर्डिले, सुनील सूर्यवंशी,अशोक शोभे,प्रविण बहिर,बाळू कर्डिले,शिवा कर्डिले,शेखर खेत्रे,सतीश भोसले, राजू तळेकर, गोकुळ कर्डिले,संतोष वहाळ, प्रकाश खेडकर,अशोक ढोबळे,विजय शेळके माजी सरपंच अतुल कोठुळे,पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रविण पोकळे,पत्रकार सचिन रानडे यांच्यासह प्रमुख पदाधिकारी,सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य,कार्यकर्ते, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शारदा प्रतिष्ठानचे आदर्श शिक्षक...

उमापूरचे शिक्षक धर्मराज करपे, जि.प.प्रा. शाळा तळणेवाडीचे शिक्षक डॉ. संजय पांढरे, जय भवानी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य वसंत राठोड, जि.प.प्रा. शाळा माळापूरी, ता.बीडचे शिक्षक ब्रम्हनाथ घोडके आणि जि.प.प्रा. शाळा हरकी निमगाव, ता. माजलगावचे शिक्षक लक्ष्मण सरवदे या अकरा शिक्षकांना सन २०२४ चा आदर्श शिक्षक पुरस्कार शारदा प्रतिष्ठानकडून जाहिर करण्यात आला असल्याची घोषणा शारदा प्रतिष्ठानचे कार्यवाह अमरसिंह पंडित यांनी केली आहे.

## ऊसतोड कामगारांच्या मुलांनी...

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. मान्यवर व उपस्थितांचे कु.वैष्णवी यादव व कु.आकांक्षा गावडे या विद्यार्थिनींनी स्वागत गीत गाऊन स्वागत केले. या कार्यक्रमांमध्ये थापडे सर यांनी शासनाच्या योजनेबद्दल माहिती विद्यार्थ्यांना दिली तसेच कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक लक्ष्मणजी बारगजे यांनी इतर मागास बहुजन कल्याण विभागातील शासनाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती देऊन इयत्ता अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष युवा नेते संजयभाऊ आंधळे यांनी अध्यक्षीय समारोप पर विचार व्यक्त करताना म्हणाले की,इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे निरीक्षक लक्ष्मणजी बारगजे सर यांनी सविस्तर शासनाच्या योजनेची माहिती दिल्याबद्दल त्यांच्या आभार मानले वंचित,शोषित,पीडित व ऊसतोड कामगारांच्या मुलांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन आपल्या वडिलांच्या हातातील कोयत खाली ठेवावे असे मत त्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक विद्यालयाचे प्राचार्य राऊत डी.डी.यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अंडील जी.पी.यांनी केले व कार्यक्रमाचे आभार पर्यवेक्षक धाईतिडक सर यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद यांनी परिश्रम घेतले या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## लाडकी बहीण योजनेसाठी आता घरबसल्या आधार कार्ड बँकेला लिंक करा ; जाणून घ्या स्टेप्स

'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे' पैसे महिलांच्या खात्यात येण्यास सुरुवात झाली आहे. मात्र, अजूनही काही महिलांच्या खात्यात पैसे आले नाहीत. अनेक जणींचं आधार कार्ड बँक अकाऊंटशी लिंक केलेलं नाही. यामुळे योजनेचे पैसे येण्यास अडचण येत आहे. आता तुम्ही घरबसल्या देखील आधार कार्ड बँकेला लिंक करू शकता, ते कसं हे खाली सविस्तर दिलं आहे. आधार कार्ड बँक खात्याशी लिंक आहे की नाही, कसं ओळखणार ?

सर्वात अगोदर गुगलवर जाऊन my aadhar असे सर्च करावे. त्यानंतर माय आधारच्या वेसबाईटवर क्लिक करून आधार कार्ड नंबर आणि कॅप्चा भरून लॉगिन करावे. त्यानंतर लॉग इन विथ ओटीपी क्लिक करा. तुमच्या मोबाईलवर एक ओटीपी येईल, तोही तिथे टाकावा.

ओटीपी टाकल्यावर लॉग-इन करा. तुम्हाला समोर आधार कार्डची होम-स्क्रीन दिसेल.

खाली स्क्रोल केल्यावर Bank seeding status हा ऑप्शन दिसेल, त्यावर क्लिक करावे.

येथे तुम्हाला तुमचा आधार कार्ड नंबर, बँकेचे नाव, आणि तुमचं इरपज्ञ शिशवळपर्स ीरिीी हे क्टिव्ह आहे की नाही ते दिसेल.

आधार कार्ड लिंक नसेल तर ते स्टेटस ळपरलींळींश असं दिसतं. (adhr Card Link)

आधार कार्ड बँक अकाऊंटशी लिंक कसं करणार ?

सर्वात अगोदर गुगलवर जाऊन NPCI (National Payment Corporation of India) असं सर्च करा.

पुढे तुम्हाला npci.org.in ही अधिकृत वेबसाईट दिसेल त्यावर क्लिक करा. होमस्क्रीनवर खाली स्क्रोल केल्यानंतर लेपीीीशी हा ऑप्शन दिसेल, त्यावर क्लिक करावे. येथे तुम्हाला Bharat adhar seeding हा पर्याय दिसेल , तेथे शपरलश्रश वर क्लिक करावे.

नंतर एक नवीन पेज ओपन होईल. येथे तुम्हाला आधार कार्ड नंबर टाकावा लागेल. नंतर आधार नंबर लिंक करायचा असेल तर त्यासाठी request for adhar bm seeding या पर्यायावर क्लिक करावे. (adhr Card Link) खाली तुमच्या कोणत्या बँकेचं अकाऊंट लिंक करायचं आहे, त्या बँकेचे नाव निवडा आणि fresh seeding ( नव्याने लिंक करण्याचा पर्याय) यावर क्लिक करा. पुढे बँकेचा अकाऊंट नंबर टाका. अकाऊंट नंबर कन्फर्म केल्यावर खाली काही टर्म्स आणि कंडीशन्स दिसतील, त्या पूर्ण वाचा आणि स्वीकारा. त्यानंतर खाली दिलेला कॅप्चा भरून proceed बटणावर क्लिक करावे. (adhr Card Link)

खाली पुन्हा तुम्हाला टर्म्स अँड कंडीशन्स दिसतील. तिथे सीशश रपव उेपींळपींश करावे. यानंतर तुम्हाला एक ओटीपी येईल, तो ओटीपी टाका. अशा प्रकारे तुम्ही तुमचं आधार कार्ड तुमच्या बँक अकाऊंटसोबत लिंक करू शकता.

# महाराष्ट्रात पावसाचा धुमाकूळ, मराठवाड्यात अक्षरशः थैमान

## अनेक जिल्ह्यांना रेड अलर्ट, नागरिकांनो काळजी घ्या

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये सध्या मुसळधार पाऊस पडत आहे. विशेषत: मराठवाड्यात प्रचंड पाऊस पडतोय. अनेक जिल्ह्यांमध्ये पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, काही जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट देण्यात आला आहे.

पुणे हवामान विभागाचे प्रमुख के. एस. होसाळीकर यांनी याबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे. राज्यात पुढचे चार ते पाच दिवस मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. येत्या २४ तासासांठी मराठवडा, विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. पावसाचा हा धुमाकूळ मध्य महाराष्ट्र आणि कोकणातही असण्याची शक्यता आहे. पावसाचा जोर उद्याही कायम असण्याची शक्यता आहे. या पावसाची तीव्रता ४ सप्टेंबरपासून कमी होण्याची शक्यता असल्याची माहिती के. एस. होसाळीकर यांनी दिली आहे.

लातूर जिल्ह्यात गेल्या २४ तासांपासून मुसळधार पाऊस पडतोय. मुसळधार पावसामुळे छोटे-मोठे ओढे आणि नद्यांना पूर आला आहे. विशेष म्हणजे लातूरसाठी रेड अलर्ट देण्यात आला आहे. लातूर जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह आणखी जोराने पाऊस कोसळण्याची शक्यता आहे. लातूर जिल्ह्यातल्या ग्रामीण भागातही पाऊस सुरूच आहे. त्यामुळे शेती पिकांचे मोठं नुकसान होत आहे. अनेक शेतात पाणी घुसल्याने पिकांचे नुकसान झालं आहे. लातूर जिल्ह्यातल्या उदगीर, अहमदपूर, रेणापूर, चाकुर, निलंगा भागात पिकांचे मोठं नुकसान झालं आहे.

### ● नांदेड जिल्ह्यातही मुसळधार पाऊस

नांदेड जिल्ह्यामध्ये सकाळपासून जोरदार पावसाला सुरुवात झालेली आहे. दुपारी एकच्या नंतर हवामान खात्याने नांदेड जिल्हा रेड अलर्ट जाहीर केलेला आहे. जिल्ह्यातील २६ महसूल मंडळामध्ये अतिवृष्टी झाली आहे. त्याचबरोबर गोदावरी नदीसह इतर छोटे-मोठे नदी नाले दुथडी भरून वाहू लागले आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून नांदेड जिल्ह्यात पावसाने उघडीप दिली होती. पण आज झालेल्या जोरदार पावसामुळे खरीप हंगाम धोक्यात आलं आहे. अनेक भागात शेतामध्ये पाणी साचलं आहे. त्यामुळे मूग, सोयाबीन सह इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. नांदेड जिल्ह्यातील अनेक भागात पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व यंत्रणांना सतर्कतेचे आदेश जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिले आहेत. आपत्ती व्यवस्थापन विभाग स्थितीवर



लक्ष ठेवून असून ज्या ठिकाणी मदतीची आवश्यकता आहे. त्या ठिकाणी आवश्यक साधनसामुग्रीसह तैनात राहण्याची सूचना बचाव पथकांना केली आहे. जिल्ह्यातील ६३मंडळांपैकी २६ मंडळांमध्ये ६५ मिमी पेक्षा अधिक पाऊस झाला आहे. किनवट, हिमायतनगर, हदगाव, भोकर, मुदखेड आदी तालुक्यात मोठ्या प्रमाणात मुसळधार पाऊस सुरू आहे. त्यामुळे नदी नाल्यांच्या पाणीपातळीत वाढ झाली आहे. नागरिकांनी धोक्याच्या ठिकाणी जाणे टाळावे असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

### ● वाशिम जिल्ह्यात नदी-नाल्यांना मोठा पूर

अति मुसळधार पावसानं जिल्ह्यातील अनेक नदी-नाल्यांना मोठा पूर आला आहे. मानोरा ते कारंजा रस्ता दापुरा जवळच्या नाल्याला आलेल्या मोठ्या पुराने बंद झाला आहे. तसेच इंझोरी गावाजवळील नाल्याला मोठा पूर आल्यानं इंझोरी-जामदरा रस्ता बंद झाला आहे. शेतात गेलेले शेतकरी अडकल्यानं त्यांचे हाल होत आहेत. तर मंगरुळपीर तालुक्यातील कोठारी बोरव्हा परिसरातील नाल्यानाही मोठा पूर आला आहे. पोहरादेवी शिवाराम धील शेतात पाणी घुसल्यानं शेतीचं अतोनात नुकसान झालं आहे.

### ● बीडमध्येही मुसळधार पाऊस

बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यात २४ तासांपासून पावसाची संततधार सुरु असल्याने नागापूर धरण ओव्हरफ्लो झाले आहे. त्यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आबे. संततधार पावसामुळे परळी शहरासह १५ गावांना पाणी पुरवणारे नागापूर धरण ओसंडून वाहत आहे. धरणातील पाणी वाण नदीपत्रात सोडल्यामुळे नदीचे पाणीही ओसंडून वाहत आहे. त्यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आलेला आहे.

### ● परभणीत नागरी वस्तीत शिरलं पावसाचं पाणी

परभणीत पावसाचा जोर कायम आहे. परभणीत कालपासून ६५ ते ७० मिलिमीटर इतका पाऊस झाला आहे. हळूहळू पाणी आता सखल भागात असलेल्या नागरी वस्त्यात शिरत आहे. त्यामुळे नागरिकांना या ठिकाणी घरात जाण्यासाठी रस्ता राहिलेला नाही. अशीच परिस्थिती राहिली तर अतिवृष्टी परिस्थिती निर्माण होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

### ● हिंगोली पावसाचा हाहा:कार

हिंगोली जिल्ह्यातही मुसळधार पाऊस सुरु आहे. हिंगोली शहरातील बांगर नगर परिसरात असलेल्या मॉलमध्ये शटर तोडून पाणी आत मॉलमध्ये शिरलं आहे. मॉलमध्ये आत्ताही डोक्याच्या वर पाणी असल्याचं व्यापारी सांगत आहेत. पत्त्याप्रमाणे मॉलमधील किराणा, फ्रीज काउंटर, असं साहित्य वाहून गेल्याचंही व्यापाऱ्यांनी ीं९ मराठी शी बोलताना प्रतिक्रिया दिल्या आहेत.

### ● जळगावच्या मुक्ताईनगरमध्येही मुसळधार पाऊस

जळगावच्या मुक्ताईनगरमध्येही मुसळधार पाऊस पडला आहे. आठ दिवसांच्या विश्रांतीनंतर विजेच्या कडकडाटांसह मुक्ताईनगर तालुक्यात मुसळधार पाऊस सुरू आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. तर उष्णतेपासून हैरान झालेल्या नागरिकांना देखील मोठा दिलासा मिळाला आहे

### ● यवतमाळमध्ये ढगफुटी सदृश्य पाऊस

यवतमाळ जिल्ह्यातील पुसद या ठिकाणी ढगफुटी सदृश्य झालेल्या पावसाने वडसद या नाल्याला पूर आला आहे. पुरामुळे नाल्याने रौद्र रूप धारण केले होते. या पुरात या भागातील शेती पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. काही घरात पुराचे पाणी सुद्धा शिरले होते. यावेळी नाल्या लगतच्या एका घरात पाणी शिरले. या घरातील ३ जण या पुरात अडकले होते. यावेळी आमदार इंद्रनील नाईक यांनी तात्काळ यंत्रणा बोलवून अडकलेल्या तीनही जणांना रेस्क्यू करुन वाचवले.

---

## ◆ थोडक्यात...

### प्रा. डॉ.विनोद जगतकर यांचा कै.लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयातील सत्कार संपन्न



**परळी । प्रतिनिधी**

संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या अशासकीय सदस्य पदी निवड झाल्याबद्दल प्रा. डॉ. विनोद जगतकर यांचा सत्कार सोहळा संपन्न. कै.लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयातील माझे सहकारी डॉ.आर.एल. जोशी प्रा. प्रवीण फुटके प्रा. नव्हाडे, प्रा.शरद रोडे प्रा. विशाल पौळ,विकास देशपांडे इत्यादी याप्रसंगी उपस्थित होते.

### समृद्धी महामार्गावर भीषण अपघात ! टेम्पो ट्रॅव्हलरची ट्रकला धडक ; १५ प्रवासी जखमी



**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

समृद्धी महामार्गावर पुन्हा एकदा भीषण अपघाताची घटना घडली आहे. समृद्धी महामार्गावर उभ्या असलेल्या आयशर ट्रकला टेम्पो ट्रॅव्हलरने पाठिमागून जोरदाची धडक दिली, हा अपघात इतका भीषण होता की त्यामध्ये टेम्पो ट्रॅव्हलरच्या समोरील भागाचा चुराडा झाला आहे. दरम्यान या टेम्पो ट्रॅव्हलरमधून एकूण १५ प्रवासी प्रवास करत होते, या अपघातामध्ये हे १५ प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. पहाटे साडेचारच्या सुमारास हा अपघात झाला आहे. जखमींना स्थानिकांच्या मदतीने तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे, जखमींपैक चालक आणि वाहकाची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती समोर येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास हा भीषण अपघात झाला. ट्रॅव्हल्सने ट्रकला दिलेली धडक इतकी जोरदार होती की दोन्ही गाड्यांचे मोठे नुकसान झाले असून ट्रॅव्हल्सच्या समोरील भागाचा चुराडा झाला आहे. जखमींपैकी ड्रायव्हर आणि सहायकाची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत.

### श्रद्धा,शील,दान व प्रज्ञेशिवाय कोणीही उपासक होऊ शकत नाही- भिक्खू धम्मशील थेरो



**बीड । प्रतिनिधी**

धम्मात सफलता प्राप्त करण्यासाठी सद् गुणाची आवश्यकता असते, त्यासाठी उपासकांना चार सद्गुण आवश्यक असतात. ते म्हणजे श्रद्धा, शील, दान आणि प्रज्ञा. प्रज्ञा म्हणजे शहाणपण, ते म्हणजे सत्य असत्यातील फरक जाणने, अनित्य, अनात्म, दुःखाचा बोध होणे तसेच आर्य अष्टांगिक मार्गाचा अवलंब करणे होय. श्रद्धेला शहाणपणाची म्हणजेच प्रज्ञेची जोड हवी असते. उपासकाने दान कुणास द्यावे, कसे द्यावे यासाठी प्रज्ञेची गरज असते. प्रज्ञा तीन प्रकारची असते १) इतरांचे ऐकून मिळते ती श्रुतमय प्रज्ञा' २) चिंतनातून मिळते ती चिंतनमय प्रज्ञा' ३) प्रत्यक्ष अनुभवातून मिळते ती भावनामय प्रज्ञा पण मनुष्याला प्रज्ञा ही प्रत्यक्ष अनुभवातूनच येते. उपासकाला दान देताना सहा गोष्टीचे स्मरण हवे. १)श्रद्धायुक्त अंतःकरणातून दान द्यावे. २)दान विधीपूर्वक द्यावे दोन्ही हाताने गुडघ्यावर बसून विनम्रतेने निस्वार्थपणे परतफेडीची अपेक्षा न करता द्यावे. ३)एकाग्रचित्ताने जागृतीपूर्वक दान द्यावे.४)द्वेषभावना विरहित मैत्रीयुक्त चित्ताने दान द्यावे.५)अहंकार विरहित दान द्यावे.६) लोभविरहित भावनेने, निरपेक्ष भावनेने दान द्यावे. या चारही सद् गुणा शिवाय मनुष्याला सुख नाही निर्वाण नाही तसेच जीवन सार्थकी लागत नाही. श्रद्धा, शील, दान, व प्रज्ञेशिवाय खरा उपासक होऊ शकत नाही. असे प्रतिपादन पू.भिक्खू धम्मशील थेरो यांनी श्रावस्ती बुद्ध विहार म ाजलगाव येथे केले. यावेळी पू.भिक्खू धम्मशील थेरो हे उपासकाचे चार सद् गुण या विषयावर बोलत होते. यावेळी रणजीत घनघाव व अनुपमा रणजीत घनघाव यांनी खिरदान दिले. यावेळी प्रस्ताविक सदधम्म सेवा संघाचे जी एन घनघाव यांनी केले तर, सूत्रसंचालन ड.दशरथ मकसरे, यांनी केले.तर आभार सदाशिव भालेराव यांनी मानले. यावेळी संस्थेचे पांडुरंग जाधव, एन.जी.शिनगारे, सोपानराव उजगरे, भगवानराव सातपुते, रविकांत उघडे, लिलाबाई उजगरे, धम्मपाल जावळे,विजय होळकट्टी हे उपस्थित होते. हिंगोली येथील शकुंतलाताई भूक्तार, पार्वतीताई श्रीखंडे, माजी प.स.सभापती संजीवनी पौळ, प्रकाश सोनकांबळे,भारत घनगाव, प्रतिभा वाघमारे,बन्सी शिरसट,तात्यासाहेब साळवे, वंदनाताई भालेराव,नितीन डोंगरे आदी. उपासक उपस्थित होते.

### टी सी हरवला आहे

शुभम मधुकर हुंबे (मु. पो.पिंपळनेर ता.जी.बीड ) या नावाचा १० वी पास असलेला टी.सी. पिंपळनेर - बीड प्रवासात हरवला आहे. सापडल्यास खालील नंबरवर संपर्क साधावा.

**संपर्क क्रमांक : ९०२१७७००८०**

---

# भटके विमुक्त आदिवासी यांची संवाद यात्रेला सोलापुरातून सुरुवात

## संवाद यात्रेत भटके विमुक्त एकवटले मुंबई पुणे, मराठवाडा विदर्भातून आले



**● एकल महिला संघटना ही जालना, औरंगाबाद, नांदेड, परभणी व सोलापूर जिल्ह्यात सहभागी होणार आहे**

**सोलापूर । प्रतिनिधी**

डवरी, मदारी, बहुरूपीसह अनेक घटक एकत्र आले. अंगावर फटके मारत कला दाखवत पोतराज निघाले. पारधी, भिल्ल चोर नाही, माणूस हाय, माणूस हाय. आमचा लढा न्यायासाठी, माणूस म्हणून जगण्यासाठी. अशा घोषणा देत लक्ष वेधले.

गुन्हेगारी जमाती कायद्यातून मुक्त करण्याला ७२ वर्षे होत आहेत. आजही भटके विमुक्त आदिवासी यांना जात, वर्ग या आधारावर विषमतेला सामोरे जावे लागत आहे. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, रोजगार असे मूलभूत प्रश्न सुटलेले नाहीत. याकडे शासनाचे लक्ष वेधावे म्हणून भटके विमुक्त आदिवासींच्या हक्कासाठी राज्यव्यापी संवाद यात्रा सोलापुरातून निघाली.

संवाद यात्रेत एका वाहनावर आपल्या उद्देशाचे पोस्टर लावून पुढे राज्यभरातून आलेले समाज घटक निघाले. त्यांच्यामध्ये गोसावी, बहुरूपी, मदारी अशा अनेक घटकांनी आपली कला दाखवली. पार्क चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून ही संवाद यात्रा निघाली. या संवादयात्रेच्या

वाहनापुढे डवरी, गोसावी, बहुरूपी, मंदारी बांधव आपली कला दाखवत निघाले. भगिनी सम ाज शॉपिंग सेंटरमार्गे सिद्धेश्वर प्रशाला येथून पूनम गेटवर ही यात्रा घोषणा देत थडकली. यात्रेत ॲड. अरुण जाधव, शरद बाराथे, मुमताज शेख, भावना वाघमारे,यशवंत फडतरे, बाबूसिंग पवार, रमेश खाडे, अशोक अगावणे, राहुल गवारे, एकल म हिला संघटनेच्या रुक्मिणी नागापुरे, यांनी या संवाद यात्रेत मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन केले असून एकल महिला संघटना सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**वीस जिल्ह्यांतून जाणार संवादयात्रा**

**आजवर या भटक्या विमुक्तांनी मागण्यांबाबत प्रशासनाकडे पाठपुरावा केला होता. त्या मागण्यांचे एक प्रतीकात्मक गाठोडे प्रशासनाला देऊन जागे करण्याचा प्रयत्न या संवाद यात्रेतून झाला. मुंबई, पुणेसह विदर्भ, मराठवाडातून काही घटक अर्थात जवळपास ३०० जण या संवाद यात्रेत सहभागी झाले होते. राज्यभरात २० जिल्ह्यांतून साडेतीन हजार किलोमीटर ही संवाद यात्रा फिरणार आहे. २३ सप्टेंबर रोजी मुंबईत मंत्रालयावर मोर्चा काढून या संवाद यात्रेचा समारोप केला जाणार आहे.**

---

### वंचित बहुजन आघाडीच्या वतीने महाराष्ट्रातील महिला अत्याचार प्रकरणी निदर्शने



**तहसीलदारांना वंचित बहुजन आघाडीच्या महिलांचे निवेदन**

**ब्रह्मपुरी । प्रतिनिधी**

महाराष्ट्रासह देशातील म हिला व मुली यांच्यावर होणाऱ्या अत्याचार, बलात्कार निषेधार्थ वंचित बहुजन महिला आघाडी च्या जिल्हा उपाध्यक्षां लिंना रामटेके यांच्या मार्गदर्शाना खाली जाहिर निषेध नोंदवत तहसिलदार यांना दिले निवेदन तहसील कार्यालय ब्रम्हपुरी येथे वंचित बहुजन महीला आघाडी तर्फे मुख्यमंत्री, गृहमंत्री यांना तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी ब्रह्मपुरी यांच्या मार्फत निवेदन सादर करण्यात आले.व महीलांनवरील अन्याय व अत्याचाराचा निषेध नोंदवीण्यात आला. सध्या देशाम ध्ये व महाराष्ट्रात महीलांनवर होणारे वाढत्या बलात्काराचे व अत्याचाराचे प्रमाण वाढलेआहेत. राज्यातील कायदा सुव्यवस्था अंतीम घटका मोजत आहेत.

महीलांना व मुलींना सुरक्षा जर मिळाली नाही तर वंचित बहुजन महीला आघाडी ब्रह्मपुरी रस्त्यावर उतरून आंदोलन करेल असा इशारा वंचित बहुजन महीला आघाडीच्या जिल्हा उपाध्यक्षा लिना रामटेके यांनी यावेळी दिला. निवेदन देतांना लता मेश्राम, चंदा माटे,प्रतिमा डांगे,करुणा मेश्राम. वंदना कांबळे,प्रिया हरडे, विजया खोब्रागडे,निरू खोब्रागडे, योगिता रामटेके,सुकेशनी चौधरी,शिला बनकर व इतर महिला कार्यकर्त् उपस्थित होत्या.

---

# विद्यमान लोकप्रतिनिधींनी चेले चपाट्यांच्या माध्यमातून रुग्ण सेवेला खोडा घालण्याचा प्रयत्न करू नये: माऊली जरांगे

## माझे माणसं घ्या म्हणत रुग्णसेवेला ब्रेक लावणे म्हणजे निव्वळ बालीशपणाचे लक्षण

**आष्टी । प्रतिनिधी**

कुसंळब येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे नुकतेच मागील महिन्यात उद्घाटन झाले.यामुळे कुसंळबसह परिसरातील नागरिकांना योग्य तो आरोग्य सेवेचा लाभ मिळण्यास सुरुवात झाली. ही आरोग्य सेवा आजतागायत अविरतपणे नित्यनियमाने सुरू आहे.मात्र विद्यमान लोकप्रतिनिधी असलेल्या बाळासाहेब आजबे यांनी या रुग्णालयात माझे माणसं घेत नाहीत म्हणून रुग्णसेवेला ब्रेक लावणे म्हणजे निव्वळ बालीशपणा आहे.विद्यमान महोदयांचे हे रुग्णालय उभारणी साठी योगदान तर शून्य आहेच शिवाय काही त्यांच्या चेले चपाट्यांना हाताशी धरून काही दिवसांपासून या रुग्णसेवेला खिळ घालण्याचा प्रयत्न करून नियमित सुरू असलेली सेवा खंडित करण्याचा अट्टाहास दिसून येत आहे.त्यामुळे आता तरी हा रातराणीचा खेळ विद्यमान लोकप्रतिनिधींकडून थांबविला गेला पाहिजे अन्यथा हे रुग्णालय आजबे यांनी आपल्या कार्यकाळात पूर्ण कसे होणार नाही याचा केलेला केविलवाणा प्रयत्न आगामी काळात जनतेसमोर आणला जाईल असा इशारा जिल्हा परिषद सदस्य माऊली जरांगे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्राद्वारे दिला आहे.

यावेळी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात जरांगे यांनी विद्यमान लोकप्रतिनिधी बाळासाहेब आजबे यांच्याकडून कुसळंब येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या मंजुरीपासून ते पूर्णत्वास येईपर्यंत अनेक अडथळे निर्माण केल्याचे म्हटले आहे.या रुग्णालयाचे बांधकाम सुरू असताना त्यांनी त्यांच्या कार्यकर्त्यामार्फत जो आता स्वतः मतदार संघाचे लोकप्रतिनिधी होण्याचे स्वप्न



पाहत आहेत.त्याच्या माध्यमातून सुरू असलेल्या कामाची तक्रार दाखल करून ते रोखण्याचा केविलवाणा प्रयत्न केला होता. परंतु सदरील कामाचा दर्जा योग्य असल्याने प्रशासनाने त्यांचा बालिश प्रयत्न हाणून पाडला. तदनंतर अनेकवेळा अशाच प्रकारे या ना त्या कारणाने या रुग्णालयाच्या उभारणीस अडथळे निर्माण कसे होतील यासाठी मुंबई वारी करत अनेक प्रयत्न केले.मात्र त्यांच्या या कुत्सित भावनेला कुणीच जुमानले नसल्यामुळे आणि मी करत असलेले काम हे प्रामाणिक आणि रुग्णसेवेला वाहून घेणारे असल्याने हे रुग्णालय पूर्णत्वास आले.शिवाय या रुग्णालयाच्या जमीन हस्तंतरणापासून ते संपूर्ण इमारत उभी होईपर्यंत आमचे नेते माजी मंत्री सुरेश धस यांनी दिवसरात्र शासन दरबारी पाठपुरावा करून ग्रामीण भागातील सर्वसामान्य आणि गोरगरीब जनतेसाठी ही आरोग्यसेवा खुली करण्याचे पुण्यांचे काम केले आणि ही दिमाखदार इमारत ५ ऑगस्ट रोजी लोकार्पण करत खुली करण्यात आली.मात्र या सर्व कामात आपल्याला तसूभरही श्रेय मिळत नसल्याचा राग मनात धरून विद्यमान लोकप्रतिनिधी असलेल्या आजबे यांच्या चेले चपाट्यांनी या अविरत सुरू असलेल्या रुग्ण सेवेला खिळ घालत रुग्णालयाची रुग्ण सेवा बंद करण्याचा केविलवाणा प्रयत्न चालू असून शिवाय गुण्या गोविंदाने नादनारे कुसळब गावात जातीय तेढ निर्माण करून वातावरण दूषित करण्याचाही प्रयत्न केला गेला आहे.त्यामुळे असे कृत्य देखील होता कामा नये.म्हणून माझी विद्यम ान लोकप्रतिनिधी असलेल्यांना विनंती आहे की,हा बालिशपणा तात्काळ थांबवा अन्यथा मला तोंड उघडायची वेळ आली तर तुमचा असलेला भोंगळ कारभार जनतेसमोर आणावा लागेल असा इशाराच शेवटी जरांगे यांनी दिला.

**▶ आदर्श गाव म्हणून कुसंळब हे गाव आहे. ग्रामदैवत खंडोबाच्या कृपेने या गावाने विकास कामात गती घेतली आहे.मात्र राजकीय स्वार्थासाठी कुणी गावातील सलोख्याचे वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न करत असेल तर अशा प्रवृत्तींना गावातील जनता कदापी थारा देणार नाही.- शिवाजी पवळ, कुसळंब रहिवाशी**

**▶ आम्हाला राजकीय दबावतंत्र वापरून डावललं जातंय.- शेतकरी चंद्रकांत पवार**

**आम्ही शेतकऱ्यांनी लाख म ोलाची जमीन गावात आरोग्य केंद्र होत आहे आम्ही त्यामुळे ग्रामीण भागातील रुग्णांना सेवा मिळेल या उदात्तहेतूने दिली होती.त्यावेळेस कुटूंबातील एका व्यक्तीला या आरोग्य केंद्रात कंत्राटी कर्मचारी म्हणून पदावर घेतले जाईल असा शब्द संबंधित प्रशासनाकडून देण्यात आला होता मात्र आता यात राजकीय कुरघोडी करण्याचा प्रयत्न केला जात आहे.आम्हा शेतकऱ्यांवर अन्याय करण्याचा प्रयत्न होत आहे.त्यामुळे प्रशासनाला आमची विनंती आहे की दिलेल्या शब्दाला जागून आमच्यावर अन्याय करू नका.. अन्यथा आम्ही कुटूंबासह आमरण उपोषण करू.**

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज
। बीड । परभणी । छत्रपती संभाजीनगर । जालना । लातूर । धाराशिव । हिंगोली । नांदेड । नगर
# मराठवाडा पत्र
● जिल्हा विशेष ● सोमवार, दि. ०२ सप्टेंबर २०२४ ● पान ४






श्रावण महिन्यातील आज शेवटचा सोमवार

# बीड मधील नागरिकांना सतर्कतेचा इशारा



**बीड । प्रतिनिधी**

रविवार दि.१ सप्टेंबर पासून सकाळपासून सातत्याने बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर पाऊस सुरू आहे.

बीड शहराजवळील बिंदुसरा प्रकल्प भरल्याने नदी दुथडी भरून वाहत आहे. जिल्ह्यातील अनेक नाले, ओढे व नदी भरून वाहत आहेत. पडत असलेल्या पाऊसामुळे बिंदुसरा धरण ओसांडून वाहत असून शहरातील नदीकाठी राहणाऱ्या नागरिकाना प्रशासनाच्या वतीने सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. मागील दोन दिवसापासून राज्यासह बीडजिल्ह्यात पावसाने जोर धरलेला पाहायला मिळत असताना आज सकाळच्या पावसाने बीडचे वैभव असलेले बिंदूसरा धरण ओसांडून वाहत आहे. तसेच शहरातील नाल्या तुडुंब पाण्याने भरलेल्या पाहायला मिळत आहेत. यामुळे शहरातील नदी काठी म्हणजेच चांदणी चौकातील तसेच दत्त मंदिर गल्लीत राहणाऱ्या रहिवास्यांना प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. अशीच परिस्थिती रात्री पर्यंत राहिली तर कदाचित बीडमध्ये पूरजन्य परिस्थिती उद्भवू शकते. यामुळे नदीकाठी राहणाऱ्या रहिवास्यांनी सतर्क राहावे. असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

**▶ पुढील काही तास पावसाचा जोर अशाच प्रकारे कायम राहून नदीने धोकादायक पातळी ओलांडल्यास नदीकाठच्या नागरीकांना धोका निर्माण होऊ शकतो. सर्वांनीच सतर्क व सावध राहिले पाहिजे, महत्त्वाचे काम नसल्यास घराबाहेर पडणे टाळायला हवे. तसेच काहीही अडचण आल्यास आपत्कालीन विभाग ०२४४२-२९९२९९ व माझे स्विय सहायक श्री. गणेश भरनाळे +९१ ७७९८९७३१९९, श्री. संदिप नवले +९१ ९७६६२७२७२४, श्री. अशोक चौरे +९१ ८१४९७७५७७७ यांच्या या नंबरवर तातडीने संपर्क साधावा असे आवाहन करतो.**

## थोडक्यात...

### शालेय रोलर स्केटिंग स्पर्धेमध्ये ट्विंकलिंग स्टार स्कूलच्या खेळाडूंचे घवघवीत यश



**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा क्रीडा संकुल बीड येथे शालेय रोलर स्केटिंग स्पर्धा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बीड यांच्या वतीने घेण्यात आल्या होत्या या स्पर्धेमध्ये जिल्हाभरातून विविध शाळेच्या खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता .या स्पर्धा मध्ये ११ ,१४ १७ व १९ वर्षातील मुले व मुली कॉड आणि इनलाईन प्रकारात साहभागी झाले होते . या स्पर्धेमध्ये अकरा वर्षातील कॉड स्केटिंग प्रकारामध्ये श्री बिरू चौरे या खेळाडूने अतिशय उत्कृष्ट असे कामगिरी करत द्वितीय क्रमांक मिळवले तर सिद्धी जायभाय हिने प्रथम क्रमांक मिळवून यश संपादन केले. या यशाबद्दल ट्विंकलिंग स्टार स्कूलचे चेअरमन गणेश मैड, स्कूल संचलिका शितल मैड, स्कूल अकॅडेमिक डायरेक्टर कोमाथ भास्करन , प्राचार्या जयश्री कदम , उपप्राचार्य दीपक झा, उपप्राचार्य कृष्णकुमार , क्रीडाशिक्षक शिक्षक अशोक चौरे आणि दिनेश ढाकणे तसेच शिक्षक वर्ग , पालकांनी खेळाडूंचे अभिनंदन केले व पुढील संभाजीनगर येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

### चंपावती विद्यालयामध्ये मुलींना स्वरक्षणाचे मार्गदर्शन



**बीड । प्रतिनिधी**

चंपावती माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात, विद्यार्थी सुरक्षा चर्चासत्र आयोजित केले. मा.श्रीमती प्रणितताई गंगाखेडकर ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी जि.प.बीड. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.एन.डी. कुलकर्णी मॅडम यांनी मार्गदर्शन केले.या चर्चासत्रात मार्गदर्शन करताना मा.श्रीमती प्रणितताई गंगाखेडकर विद्यार्थिनींच्या सुरक्षेबाबत बोलताना म्हणाल्या बसमध्ये प्रवासात, दिवसेंदिवस समाजात वावरताना, शाळा, शाळेबाहेर मुली सुरक्षित नाहीत. मुलींनी चांगला,वाईट स्पर्श कसा ओळखावा.मुलगी का चुकते ? मुली स्तुतीला का फसतात ? मुलींनी चांगल्या आणि वाईट गोष्टी यामधील फरक समजून घेणे आवश्यक आहे.जर काही वाईट प्रसंग घडला तर आपल्या मनावरील दडपण कमी करण्यासाठी आपल्या विश्वासातील आपले आई-वडील, बहिण, शिक्षिका यांना न घाबरता सांगा म्हणजे पुढील वाईट प्रसंग टळतील.तसेच समाजात वावरताना,शिक्षण घेतांना मुलींना कोणत्या अडचणी येतात ? जवळच्या नातेवाईकांना कसे ओळखावे.मौल्यवान वस्तू घेऊ नये,खायला देणे या अमिषांना बळी न पडणे, संयम राखायला शिकणे,स्वतःला ओळखायला शिकणे, चांगला माणूस म्हणून अभिमानाने कसे जगावे, स्वसंरक्षणासाठी मुलींनी कराटे प्रशिक्षण घेणे,तंदुरुस्त असणे गरजेचे आहे.याबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले. शाळेच्या मा. मुख्याध्यापिका तथा प्राचार्या सौ.एन.डी. कुलकर्णी मॅडम यांनीही काही वेळेस मुले सुद्धा मुलींच्या त्रासाला बळी पडतात.अशा गोष्टी घडू नयेत म्हणून मुलींनी काळजी घेणे आवश्यक आहे हे सांगितले.मुलींना स्वसंरक्षणासाठी योग्य मार्गदर्शन केले.शेवटी सर्व विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाची शपथ देण्यात आली. या कार्यक्रमासाठी शाळेतील सहशिक्षिका सौ. वैरागी मॅडम, सौ.टेकाळे मॅडम त्यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

### चौसाळा शहर म्हणजे घाणीचे साम्राज्य!

**चौसाळा । प्रतिनिधी**

सोलापूर महामार्गावर मोठी लोकसंख्या असणारे शहर म्हणजे चौसाळा शहर होय,या ठिकाणी रोज जवळपासच्या किमान ३० गाव खेडयाचे नागरिक कामानिमित्त या ठिकाणी येतात. चौसाळा शहरात दर बुधवारी आठवड याचा मोठा बाजार भरतो,आणी या बाजारासाठी येथे प्रचंड गर्दी झालेली असते.म्हणजे एकंदरीत चौसाळा शहर हे मोठी बाजारपेठ जरी असली तरी मात्र या ठिकाणच्या नागरिकांचे आरोग्य सतत धोक्यात आलेले दिसते,आणी याला कारण आहे ते म्हणजे या ठिकाणी जागोजागी साचलेले कचर्याचे ढिगारे, घाण, सांडपाणी, आणी कचरा.

# माजलगावात कोयत्याने हल्ल्यात दोन गंभीर जखमी ; नगदी पैसे हिसकावले

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरातील दोन वेगवेगळ्या भागात एकाच युवकाने दोघा जणांवर कोयत्याने हल्ला करुन गंभीर जखमी करुन नगदी रक्कम ५हजार ,५००रु. हिसकावून नेल्याची घटना घडली. या दहशत निर्माण करणाऱ्या घटने विषयी मिळालेल्या माहितीनुसार पहिल्या घटनेतील पिडीत फिर्यादी अतुल रावसाहेब भदर्गे अक्षरा हॉटेल मालक रा.जयभीम नगर,माजलगाव यांनी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी नुसार नमुद नावाची जेवणाची हॉटेल राष्ट्रीय महामार्ग -६१वरील माजलगाव बायपास रोडवर असुन तेथे प्रकरणातील मुख्य आरोपी शेख शेरखान उर्फ बब्बु नजीर रा.हनुमान चौक, पॉवर हाऊस रोड,माजलगाव हा ३०आगस्ट रोजीच्या पहाटे ०१:४०वा.च्या सुमारास इतर आरोपी नामे शेख ईरफान रा.मेनरोड,माजलगाव, शेख सादेक रा.न.प.जवळ,माजलगाव, सय्यद रफिक उर्फ सद्दु रा.फुलेनगर, माजलगाव हे संगनमताने आले होते. आणि त्यांनी बंद हॉटेल चा दरवाजा जोरात वाजवला म्हणुन अतुल भदर्गे यांनी दरवाजा उघडल्यावर आरोपी आत घुसले व त्यांनी जेवणाची मागणी केली यावर अतुल म्हणाले की, आता जेवण मिळणार नाही. यावर शेख शेरखान उर्फ बब्बु नजीर याने त्याच्या हातातील कोयत्याचा धाक दाखवत हुज्जत घातली तर उपरोक्त नमुद आरोपींनी शिविगाळ सुरु केली त्यानंतर अतुल यांनी सर्वांना सम जावण्याचा प्रयत्न केला. यावर शेख शेरखान याने अतुल च्या डोक्यावर कोयत्याने हल्ला करण्याचा प्रयत्न केला आणि तो वार उजव्या हाताने आडवला यात ते गंभीर जखमी झाले तर इतर आरोपींनी दगडांचा मारा करुन जखमी केले तसेच दहशत पसरवुन हॉटेलच्या

(उर्वरित पान २ वर)

## या वर्षीचा आदर्श पुरस्कार करपे व पांढरे यांना



**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील माजी आमदार अमरसिह पंडित यांच्या संकल्पनेतून गेवराई विधानसभा मतदार संघातील गुणी गुरुजनांचा गौरव व्हावा, शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या शिक्षकांना प्रोत्साहन आणि प्रेरणा मिळावी या उद्देशाने शारदा प्रतिष्ठानकडून सातत्याने पंधरा वर्षे आदर्श शिक्षक पुरस्काराचे आयोजन केले जाते. यावर्षी १६ व्या आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण समारंभाचे गुरुवार, दि.५ सप्टेंबर रोजी गोदावरी सभागृह, र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई येथे सकाळी १० वाजता आयोजन करण्यात आले. प्रतिष्ठानचे कार्यवाह श्री. अमरसिंह पंडित साहेब, सुप्रसिध्द व्याख्याते डॉ. संजय कळमकर आणि बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष श्री विजयसिंह पंडित यांची प्रमुख उपस्थिती यावेळी राहणार आहे. या कार्यक्रमात साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांच्या कथेवर आधारीत सुलतान लघुपटाचे दिग्दर्शन

(उर्वरित पान २ वर)

## माजीमंत्री सुरेश धस यांच्या हस्ते हॉटेल ओमगार्डनचे उद्घाटन



**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील शेरी येथे महेश खकाळ, अशोक खकाळ,साहेबराव शिंदे यांनी नव्याने सुरू केलेल्या हॉटेल ओम गार्डनचे आज माजीमंत्री सुरेश आण्णा धस यांच्या हस्ते उदघाटन संपन्न झाले.

उदघाटन प्रसंगी सुरेश धस बोलताना म्हणाले,अतिशय प्रसन्न वातावरणात प्रशस्त सर्व सोयी सुविधापूर्ण हॉटेल सुरू केले आहे. स्वच्छता आणि कॉलिटी या सूत्रावर हॉटेल व्यवसायात भरभराटी होते. नव्याने सुरू केलेल्या व्यवसाय शुभेच्छा देत दर्जेदार सेवा देण्याचे यावेळी सांगितले. यावेळी देविदास धस,उद्धव दरेकर,संदीप खकाळ,अहिल्यानगर नगराध्यक्ष सागर म थुडकर,कड्याचे सरपंच युवराज पाटील,

सतीष शिंदे,अनिल ढोबळे,पावन५ शेठ शिंदे,सरपंच केशव अडसूळ,सरपंच तात्या खेडकर,अमोल शिंदे,सरपंच अजित घुले,सरपंच बाळू गव्हाणे, रमेश डोके उद्योजक अशोक चौधरी, ज्ञानेश्वर चौधरी, (उर्वरित पान २ वर)

## शारदा प्रतिष्ठानचे आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर

### व्याख्याते डॉ.कळमकर आणि दिग्दर्शक कांबीकर यांच्या उपस्थितीत होणार वितरण



**गेवराई । प्रतिनिधी**

शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या गुणी गुरुजनांचा गौरव करण्याच्या उद्देशाने मागील पंधरा वर्षांपासून शारदा प्रतिष्ठान सातत्याने शिक्षक दिनी आदर्श शिक्षकांना पुरस्कार देवून गौरव केला आहे. प्रतिष्ठानच्या १६ व्या आदर्श शिक्षक पुरस्काराची घोषणा कार्यवाह अमरसिंह पंडित यांनी केली आहे. शिक्षक दिनी आयोजित केलेल्या दिमाखदार सोहळ्यात सुप्रसिध्द व्याख्याते डॉ. संजय कळमकर यांच्या प्रमुख उपस्थितीत यावर्षी पुरस्काराचे वितरण होणार आहे. साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांच्या

कथेवर आधारीत सुलतान चित्रपटाचे दिग्दर्शक तथा गेवराईचे भुमिपूत्र अविनाश कांबीकर यांचा या कार्यक्रमात सत्कार आयोजित करण्यात आला आहे. पुरस्कार प्राप्त शिक्षकांचे प्रतिष्ठानचे कार्यवाह अमरसिंह पंडित यांनी अभिनंदन केले आहे. गेवराई विधानसभा मतदार संघातील गुणी गुरुजांनचा गौरव व्हावा, शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या शिक्षकांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने शारदा प्रतिष्ठान सामाजिक स्वयंसेवी संस्थेकडून मागील पंधरा वर्षे सातत्याने आदर्श शिक्षक पुरस्काराचे आयोजन केले जाते. यावर्षी १६ व्या आदर्श

शिक्षक पुरस्कार वितरण समारंभाचे गुरुवार दि. ५ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता गोदावरी सभागृह, र. भ. अट्टल म हाविद्यालय, गेवराई येथे आयोजन करण्यात आले आहे. जि.प.प्रा. शाळा राजपिंप्रीचे मुख्याध्यापक धनंजय सुलाखे, जि.प.प्रा. शाळा अर्धपिंप्रीचे शिक्षक डॉ. राहुल घाडगे, जि.प.प्रा. शाळा आम्लाचे शिक्षक भारत काकडे, जि.प.प्रा. शाळा मुधापूरीच्या शिक्षिका श्रीमती रंजना गायसमुद्रे, मोहिमाता विद्यालय मादळमोहीचे शिक्षक गुलाब शेख, जि.प.प्रा. शाळा नागरे वस्तीचे शिक्षक भगवान नागरे, जि.प. माध्यमिक शाळा

(उर्वरित पान २ वर)

### महाराणी ताराबाई विद्यालयांमध्ये इतर मागास बहुजन कल्याण बीड विभागाच्या वतीने तालुकास्तरीय मेळावा संपन्न

# ऊसतोड कामगारांच्या मुलांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा : युवा नेते संजयभाऊ आंधळे

**वडवणी । प्रतिनिधी**

इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या विविध योजनांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी सहाय्यक संचालक,इतर मागास बहुजन कल्याण बीड यांच्या वतीने वडवणी शहरातील महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये शनिवार दि.३१ ऑगस्ट २०२४ रोजी दप्तर मुक्त शाळेच्या अनुषंगाने तालुकास्तरीय मेळावा संपन्न झाला.



या बाबत सविस्तर माहिती अशी की,वंचित,शोषित,पीडित व ऊसतोड कामगारांच्या मुलं शिक्षणापासून वंचित राहू नये त्यांच्या शिक्षणात खंड पडू नये म्हणून इतर मागास बहुजन कल्याण विभागातील शासनाच्या विविध योजनांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये तालुकास्तरीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष तथा युवा नेते संजयभाऊ आंधळे तर मुख्य अतिथी व मार्गदर्शक म्हणून बीड येथील इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे निरीक्षक लक्ष्मणजी बारगजे तसेच वडवणी नगरपंचायतचे मा.नगरसेवक सतीश बप्पा बडे,थापडे सर,अजय राठोड,अनिल कोलंगडे,श्रीकृष्ण मुने,दहे सर,शेंडगे सर,विद्यालयाचे प्राचार्य राऊत डी.डी.,उपप्राचार्य मस्के ए.आर.,पर्यवेक्षक धाईतिडक सर आदिजन मान्यवर म्हणून उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व छत्रपती राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, ... (उर्वरित पान २ वर)

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com